## रे.दि.मु.क्र. ३१/२०१० मधील निशाणी क्र. १३३ खालील आदेश

प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज रिट पिटीशन क्र. ३९८२/२०१८ चे अंतिम आदेशापर्यंत प्रस्तुत दावेचे कामकाज तहकूब व्हावे व रिट पिटीशन क्र. ३९८२/२०१८ चे कामकाज लवकरात लवकर चालवून घेणेबाबत वादींना आदेश व्हावेत यासाठी दाखल केला आहे. वादींतर्फे त्यांचे म्हणणे निशाणी क्र. १३४ वर दाखल करण्यात आले आहे.

२) प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा निरंतर ताकिदीकरिता दाखल केला आहे. वादींचा दावा दाखल करण्यापूर्वी प्रतिवादींनी त्यांचे स्वतःचे गट क्र. ९०४ ची रीतसर मो.र.नं. ८७६ ने दि. ०८.०९.२०१० रोजी मोजणी केलेली आहे. सदर मोजणीमध्ये वादींनी प्रतिवादींचे गट क्र. ९०४ मध्ये ००१०.५० आर अतिक्रमण केलेचे स्पष्ट झाले होते. सदरचे क्षेत्र प्रतिवादींना देवविणेचे नाही म्हणून वादींनी प्रस्तुत दाव्याची रचना केली. सदर कामी प्रतिवादींनी हजर होऊन निशाणी क्र. ३० कडे आपली सविस्तर कैफियत दाखल करून वादींनी केलेले अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळावा म्हणून काऊंटर क्लेम दाखल केला आहे. त्यानंतर वादींनी निशाणी क्र. ४२ कडे वकिलांची कोर्ट कमिशन म्हणून नियुक्ती व्हावी म्हणून अर्ज दाखल केला. सदर अर्ज गुणदोषावर चालून वादींचा अर्ज नामंजूर करण्यात आलेला आहे. दरम्यान प्रतिवादींनी मो.र.नं. ८७६/२०१० ने केलेली मोजणी अयोग्य असून ती रद्दबातल व्हावी म्हणून वादींनी सांगली येथील मे. जिल्हा अधीक्षक, भूमिअभिलेख, सांगली यांचे कोर्टात क्र. स्थगिती/एकत्री/अपील अर्ज क्र. २४/०११ दाखल केले. सदर कामी दि. २१.१०.२०११ रोजी आदेश होऊन प्रतिवादींना मो.र.नं. ८७६ ने केलेली मोजणी रद्द करवण्यात आली. त्यावर प्रतिवादींनी पुणे येथील मे. उपसंचालक भूमिअभिलेख पुणे, प्रदेश पुणे यांचे पिठासनासमोर क्र.नं.भू.१/ अपील एस.आर. /२२१४ / २०१२ दाखल केले. सदर अपील अमान्य करण्यात आले.

३)		प्रतिवादींचे पुढील कथन असे की, त्या दरम्यान सदर कामी पुराव्याचे कामकाज सुरू झाले होते. सदरची पहिली मोजणी रद्द झाल्यानंतर प्रतिवादींनी परत जे पहिल्या मोजणी वेळी तांत्रिक दोष राहिले होते. त्याची पूर्तता करून परत मोजणी करिता रीतसर अर्ज करून पैसे भरले. त्याप्रमाणे संबंधित खात्यामार्फत मोजणीची तारीख आगावू नोटीसने सर्व संबंधितांना कळविण्यात आल्या. त्याप्रमाणे दि. १९०५.२०१७ रोजी मोजणीदार समक्ष मोजणी करिता गेले असता वादींनी त्यात जोरदार हरकत घेऊन मोजणी होऊ दिली नाही. म्हणून दि. १९.०५.२०१७ रोजी सदर मोजणीदार यांनी रीतसर पंचनामा करून मोजणी कामकाज न करता परत आले.

४)		प्रतिवादींचे पुढील कथन असे की, त्यानंतर वादींनी निशाणी क्र. १०९ कडे अर्ज दाखल करून मोजणीदार यांना कारणे दाखवा अशी नोटीस काढण्यात यावी व कुठल्याही प्रकारची मोजणी करू नये म्हणून उन्हाळा सुट्टीचे कालावधीत दावेचे कामकाज बोर्डावर घेऊन अर्ज दाखल केला. वास्तविक सदर कामातील मुख्य वाद हा वादी व प्रतिवादी यांच्यातील जमिनीतील हद्दीबाबत आहे. सदरचा वाद कायमचा संपुष्टात यावा या उदात्त हेतूने प्रतिवादींनी सदर कामी निशाणी क्र. ११६ कडे तालुका उपअधीक्षक भूमीअभिलेख, जत यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती होऊन गट क्र. ९०४, ९४४ व ९४५ ची मोजणी होऊन वस्तुस्थितीप्रमाणे अहवाल सादर करण्याबाबत आदेश होण्याकरिता विनंती व प्रार्थना केल्या. सदर अर्जावर उभय पक्षकार यांचा युक्तिवाद ऐकून वादाचे स्वरूप व मुख्य विषय याचा विचार होऊन मे. न्यायालयाने प्रतिवादीचा निशाणी क्र. ११६ कडील कमिशन अर्ज मंजूर केला.

५)		प्रतिवादींचे पुढील कथन असे की, जर सदर आदेशाप्रमाणे कमिशन झाले तर वादींनी प्रतिवादींचे क्षेत्रात केलेले अतिक्रमण क्षेत्र सोडावे लागणार म्हणून सदर अर्जावरील आदेशावर वादींना मा. उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन क्र. ३९८२/२०१८ दाखल करून निशाणी क्र. ११६ चे आदेशास स्थगिती मिळविली

आहे. अशी वस्तुस्थिती असताना वादी हे सदर कामी प्रतिवादींनी त्यांचा पुरावा द्यावा किंवा पुरावा संपलेची पुरसीस द्यावी म्हणून प्रत्येक तारखेस जोर धरीत आहेत. वास्तविक जो पर्यंत निशाणी क्र. ११६ कडील आदेशाबाबत अंतिम न्यायनिर्णय होत नाही तो पर्यंत प्रतिवादींचा पुरावा होऊन हे प्रस्तुत प्रकरण प्रलंबित ठेवावे लागणार आहे. कारण प्रतिवादींचा मुख्य पुरावा निशाणी क्र. ११६ चे अंतिम आदेशावरच अवलंबून आहे. कारण दाव्यातील मुख्य वाद हा केवळ आणि केवळ दोन जमिनीमधील हद्दीबाबतचा आहे आणि सदर वाद हा तज्ञ मोजणीदार मार्फत मोजणी झाल्याशिवाय व त्यांचा अहवाल आल्याशिवाय अंतिम न्यायनिर्णय करणे अशक्य होणार आहे. सबब, वादींनी दाखल केलेले रिट पिटीशनचे कामकाज लवकरात लवकर चालवून घ्यावे म्हणून वादींना सूचना होणे न्यायाकरिता जरुरीचे झालेले आहे अशी विनंती प्रतिवादींतर्फे करण्यात आलेली आहे.

६) वादींतर्फे प्रस्तुत अर्जास असे म्हणणे दाखल केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा खोटा व लबाडीचा असून त्याचा वादी हे साफ इन्कार करतात. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाच्या कलम ९ मध्ये रिट पिटीशन क्र. ३९८२/२०१८ बाबत जो उल्लेख केलेला आहे. तो या ठिकाणी अनावश्यक आहे. वास्तविक पाहता रिट पिटीशन क्र. ३९८२/२०१८ चे कामी मुंबई उच्च न्यायालयाने प्रस्तुतच्या दाव्याच्या सुनावणी बिलकूल स्थगिती आदेश दिलेला नाही. याबाबतचे प्रतिवादींचे म्हणणे चुकीचे, खोटे व लबाडीचे आहे.

७) वादींचे पुढील प्रतिकथन असे की, या प्रकरणी प्रतिवादींच्या निशाणी क्र. ११६ च्या अर्जास मे. न्यायालयाने गट क्र. ९०४, ९४४ व ९४५ या मिळकतींची मोजणी होऊन वस्तुस्थिती निदर्शक अहवाल सादर करण्याबाबत आदेश पारित केलेला होता. सदरचा अर्ज प्रतिवादींनी दाव्याची जवळ जवळ संपूर्ण सुनावणी झाल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याने प्रतिवादींच्या कोर्ट कमिशन नियुक्तीच्या अर्जाबाबत व त्याच्या सत्यतेबाबत दाट संशय निर्माण होण्याजोगी परिस्थिती असल्याने यातील वादींनी तातडीने खालील न्यायालयाने निशाणी क्र.

११६ वर जो कोर्ट कमिशन नियुक्तीबाबत आदेश पारित केलेला होता त्यास स्थगिती आणलेली आहे. म्हणजे मुंबई उच्च न्यायालयाने दाव्याच्या सुनावणीस बिलकूल स्थगित आदेश दिलेला नाही. ही बाबही वादींनी वेळोवेळी मे. न्यायालयाच्या निदर्शनास आणलेली होती व आहे. मात्र प्रतिवादींनी या ना त्या कारणास्तव सदरचे प्रकरण जास्तीत जास्त पुढे कसे ढकलले जाईल व ते कसे अनिर्णीत राहील याचाच केवळ गांभीर्याने विचार केलेला दिसतो.

८) वादींचे पुढील प्रतिकथन असे की, प्रतिवादींना वादींनी दाखल केलेला प्रस्तुतचा दावा गुणवत्तेवर चालविण्याचे नाही. असाच अटळ निष्कर्ष या प्रकरणी निघतो. मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये वादींनी जी याचिका दाखल केलेली आहे ती सन २०१८ साली दाखल केलेली आहे. त्यास जवळ जवळ ४ वर्षांचा कालावधी लोटलेला आहे व अजून किती काळ लोटेल हे सांगता येत नाही. वादींनी दाखल केलेला दावा हा सन २०१० सालचा आहे. या घटनेसही सुमारे १२ वर्षांचा कालावधी लोटलेला आहे. तरी देखील प्रतिवादी हे बिनदिक्कतपणे प्रस्तुत दाव्याच्या सुनावणीचे कामकाज स्थगित ठेवावे अशी विचित्र व अनाकलनीय मागणी करीत आहेत. हे पाहून वादीला कमालीचे आश्चर्य वाटत आहे. ही बाब वादीस खेदाने नमूद करावीशी वाटते. सबब, प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती वादींतर्फे करण्यात आलेली आहे.

९) अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

१०) प्रकरण संचिकेचे अवलोकन केले असता वादींनी प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकिदीकरिता दाखल केला आहे. त्यामध्येच प्रतिवादींनी निशाणी क्र. ३० कडे कैफियत व प्रतिदावा दाखल केला आहे. प्रतिवादींनी त्यांचा प्रतिदावा अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळण्याबाबत व निरंतर ताकिदीकरिता दाखल केला आहे. उभय पक्षकारांच्या परस्परविरोधी कथनांचे पार्श्वभूमीवर वादींनी न्यायालयाने

निशाणी क्र. ११६ च्या अर्जावर पारित केलेल्या आदेशाविरुद्ध मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. ३९८२/२०१८ चे कामी दि. २५.०३.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता मा. मुंबई उच्च न्यायालयाने निशाणी क्र. ११६ चे कामी पारित आदेशाचे अंमलबजावणीस स्थगिती दिली असल्याचे दिसते. मात्र प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे सदरची स्थगिती ही संपूर्ण दाव्याच्या स्थगितीस सुनावणी आहे असे प्रतिवादीचे कथन आहे तर सदरची स्थगिती ही केवळ निशाणी क्र. ११६ कडील आदेशाचे अंमलबजावणीस स्थगिती आहे असे वादींचे कथन आहे. या पार्श्वभूमीवर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जान्वये केलेल्या विनंतीचा विचार केला असता प्रतिवादींनी रिट पिटीशन क्र. ३९८२/२०१८ चे अंतिम आदेशापर्यंत सदर दावेची सुनावणी स्थागित करावी व वादींनी सदर रिट पिटीशनचे काम मा. उच्च न्यायालयामध्ये तातडीने चालवून घ्यावे असे निर्देश वादींना देण्याबाबत विनंती केली असल्याचे दिसते. प्रतिवादींनी केलेल्या पहिल्या विनंतीचा विचार केला असता मा. उच्च न्यायालयाने वर नमूद केल्याप्रमाणे रिट पिटीशन क्र. ३९८२/२०१८ च्या कामी पारित केलेल्या आदेशाचे पालन केले असता सदरच्या आदेशान्वये संपूर्ण दाव्याच्या सुनावणीस स्थगिती आहे असे अन्वयार्थ काढणे संयुक्तिक होणार नाही. मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे केवळ निशाणी क्र. ११६ च्या आदेशाचे अंमलबजावणीस स्थगिती दिली आहे. त्यामुळे वादींची सदरची विनंती विचारात घेता येणार नाही असे माझे विनम्र मत आहे.

११) प्रतिवादींचे वतीने करण्यात आलेल्या दुसऱ्या विनंतीचा विचार केला असता वादींनी मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या रिट पिटीशनचे कामी प्रतिवादी देखील विरुद्ध पक्षकार आहेत. अशा परिस्थितीत प्रतिवादींना मा. उच्च न्यायालयासमोर हजर होऊन वादींनी सदर रिट पिटीशनचे काम तातडीने चालवण्याबाबतचे निर्देश देण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाकडून विनंती करून मिळविण्याची मुभा आहे. असे असताना सदर पर्यायाचा अवलंब न करता

प्रतिवादींनी या कनिष्ठ न्यायालयाने मा. उच्च न्यायालयासमोर प्रलंबित असलेले प्रकरण वादींनी तातडीने चालवून घेण्याचे निर्देश देण्याची विनंती केली आहे. सदर विनंतीचा विचार केला असता रिट पिटीशनचे कामकाज चालविण्याचा सर्वाधिकार मा. उच्च न्यायालयाला असताना सदरचे कामकाज तातडीने चालवून घेण्याबाबत या न्यायालयाने त्यातील पक्षकारांना निर्देश दिल्यास सदरचे निर्देश या न्यायालयाच्या कार्यक्षेत्राबाहेर जाऊन दिल्यासारखे होईल असे माझे विनम्र मत आहे. सबब प्रतिवादींची सदरची विनंती देखील मान्य करता येण्यासारखे नाही. या सर्व कारणांचा विचार केला असता प्रतिवादींचा सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश अंतिम सुनावणीच्या वेळी पारित करण्यात यावेत.

EKNATH KOYAPPA CHOUGALE

Digitally signed by EKNATH KOYAPPA CHOUGALE
Date: 2022.03.28 15:39:24 +0530

स्थळ:– जत (एकनाथ को. चौगले)

दि. २३.०३.२०२२ (JO Code -MHSN2400)

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

जत

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार (लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व<br>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | २३/०३/२०२२. |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | २३/०३/२०२२. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | २८/०३/२०२२. |